ePaper

| वर्ष - 6 । अंक - 174 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार। दिनांक 6 ऑक्टोबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# उद्धव ठाकरे यांना ऐकण्यासाठी दुपारपासून रीघ!




**आतील पानांत**

- निर्बंधमुक्त उत्सव असले, तरी स्वयंशिस्त पाळणे महत्वाचे!
- राष्ट्रवादी कटिबद्ध!

## दसरा मेळावा : ठाकरे विरुद्ध शिंदे... आरोप, प्रत्यारोप, उत्तर, प्रत्युत्तर

# दसरा मेळाव्यात घनघोर युद्ध..!

## आजी-माजी मुख्यमंत्र्यांची 'बापा'वरून जुंपली; दसरा मेळाव्यात ठाकरे-शिंदेंनी ओढले शाब्दिक आसूड

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

यंदाचा दसरा मेळावा अटीतटीचा ठरला आहे. शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दसरा मेळाव्याच्या व्यासपीठावर एकमेकांवर शाब्दिक आसूड ओढले. तसंच, भर मेळाव्यात दोन्ही आजी-माजी मुख्यमंत्र्यांनी एकमेकांच्या वडिलांचा उल्लेख करत टीका केली आहे. 'ही तर बाप चोरणारी औलाद. बापाचा तरी विचार करायचा. त्यांना काय वाटलं असेल. हे काय कार्ट जन्माला आलं, माझं नाव सोडून दुसऱ्या मुलाच्या बापाचं नाव लावतंय', अशी टीका माजी मुख्यमंत्री आणि शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. माझ्या बापाच्या नावाने राजकारण करण्यापेक्षा स्वतःच्या बापाच्या नावाने लोकांकडे मतं मागा, असं थेट आव्हान उद्धव ठाकरेंनी अनेकदा जाहीर भाषणांतून केलं आहे. यावेळीही त्यांनी थेट एकनाथ शिंदे यांना आव्हान करत बाप चोरणारी औलाद अशी घणाघाती टीका केली आहे. एकीकडे उद्धव ठाकरेंचं शिवाजी पार्कवरील भाषण संपत नाही तोवर तिकडे बीकेसीतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भाषणाला सुरुवात झाली. उद्धव ठाकरेंच्या संपूर्ण भाषणाचा एकनाथ शिंदेंनी समाचार घेतला. बाप चोरणारी औलाद अशी टीका झाल्याने एकनाथ शिंदेंनीही ठाकरेंवर शाब्दिक आसूड ओढले. तुम्ही तर बापाचे विचारच विकले, बापालाच विकण्याचा प्रयत्न केला, असा घणाघात एकनाथ शिंदेंनी केला. सत्तेसाठी तुम्ही हिंदुत्वासाठी तिलांजली दिली. सत्तेसाठी तुम्ही लाचार झाला. सत्तेसाठी भरकटलात. २५ वर्ष आम्ही सडलो असे बोलताना तुम्हाला काही वाटलं नाही का. तुम्हीच हिंदुत्वाचा विचार आणि बाळासाहेब यांच्याशी गद्दारी, असा रोखठोक बाणही एकनाथ शिंदेंनी ठाकरेंकडे सोडला. तर तिकडे भगवान गडावरून दसरा मेळाव्यात उपस्थितांना संबोधित करताना भाजपाकडून सर्वच स्तरांतून डावलल्यानंतर पंकजा मुंडे यांचं लक्ष आता २०२४च्या विधानसभा निवडणुकीकडे लागले आहे. 2024 ला मतदारसंघातून पक्षाने तिकीट दिले तर मी लढणार आहे, असं पंकजा मुंडे यांनी घोषित केलंय. दसरा मेळाव्याच्या निमित्ताने त्या जनतेशी संवाद साधत होत्या.

## होय मी कंत्राटी मुख्यमंत्री, एकनाथ शिंदेंची ठाकरेंवर सडकून टीका



दसरा मेळाव्यातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा खरपूस समाचार घेतला आहे. एकनाथ शिंदे यांना कंत्राटी मुख्यमंत्री म्हणून हिणवणाऱ्या ठाकरेंवर त्यांनी सडकून टीका केली आहे. होय मी कंत्राटी मुख्यमंत्री, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. तुम्ही म्हणताय की मी कंत्राटी मुख्यमंत्री आहे. पण मी सांगतो होय मी कंत्राटी मुख्यमंत्री आहे. मी जनतेची सेवा करण्याचं आणि राज्याला सुजलाम सुफलाम करण्याचं कंत्राट घेतलं आहे. या राज्याचं कंत्राट योग्य कंत्राटदाराच्या हाती गेलंय. ज्या लोकांनी सेना संपवण्यासाठी काय काय केलं? हे तुम्हाला सांगायची गरज नाही, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. कोविड काळात आम्ही पीपीई कीट घालून लोकांमध्ये गेलो. जीवाची पर्वा केली नाही. सर्वांना मदत केली. पूराच्या पाण्यातून गेलो. मीच नाही असंख्य शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांनी जीव धोक्यात घातला. अनेक पदाधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. तुम्ही त्याची दखल घेणार की नाही, असं असताना तुम्ही कुणाला सांभाळलं, असा प्रश्न एकनाथ शिंदेंनी उपस्थित केला. या राज्यात मोठे उद्योग आले पाहिजेत यासाठी मला तुमचं सहकार्य पाहिजे.

संबंधित वृत्त पान 5 वर

## आई-वडिलांची आणि शिवरायांची शपथ घेऊन सांगतो- उद्धव ठाकरे



भाजपा आणि शिवसेना यांची युती तुटण्यामागे उद्धव ठाकरेंचा हात आहे असा आरोप केला जातोय. मात्र, भाजपने दिलेला शब्द पाळला नाही. म्हणून युती तोडली असा दावा उद्धव ठाकरेंकडून करण्यात येतोय. आज पुन्हा उद्धव ठाकरेंनी याबाबत स्पष्ट भूमिका घेतली. आपली भूमिका स्पष्ट करताना त्यांनी त्यांच्या आई-वडिलांची आणि शिवरायांची शपथ घेत भाजपासोबत झालेल्या कराराची माहिती दिली. भाजपाने अडीच-अडीच वर्षांचं ठरवलं होतं, हे मी आई वडिलांची शपथ घेऊन शिवरायांची शपथ घेऊन सांगतोय. अडीच वर्ष तुमची, अडीच वर्ष शिवसेनेची. पण ते नंतर म्हणाले संभवही नही. आता जे केलंत ते तुम्ही तेव्हा का नाही केलं? सन्मानाने का नाही केलं. आता जे केलं ते तेव्हा का केलं नाही. पण त्यांना शिवसेना संपवायची आहे. असं उद्धव ठाकरे म्हणाले. पुढे त्यांनी एकनाथ शिंदे यांच्यावरही टीकास्त्र सोडलं. इतरांना बाजूला सारून यांना मंत्रिपदं दिली. आता मुख्यमंत्री झाला. आता याला शिवसेनाप्रमुख व्हायचं आहे. बाप चोरणारी औलाद. बापाचा तरी विचार करायचा. त्यांना काय वाटलं असेल. हे काय कार्ट जन्माला आलं, माझं नाव सोडून दुसऱ्या मुलाच्या बापाचं नाव लावतंय.

संबंधित वृत्त पान 5 वर

## पंकजांची नजर आता 2024 च्या निवडणुकीकडे, फुंकले रणशिंग



भाजपाकडून सर्वच स्तरांतून डावलल्यानंतर पंकजा मुंडे यांचं लक्ष आता २०२४च्या विधानसभा निवडणुकीकडे लागले आहे. 2024 ला मतदारसंघातून पक्षाने तिकीट दिले तर मी लढणार आहे, असं पंकजा मुंडे यांनी घोषित केलंय. दसरा मेळाव्याच्या निमित्ताने त्या भगवान गडावरून जनतेशी संवाद साधत होत्या. पंकजा मुंडे यांना भाजपाकडून साईड लाईनला करण्यात आल्याच्या चर्चा आहेत. पक्षात त्यांचं महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येतोय, असं मुंडेंच्या समर्थकांना वाटत आहे. त्यामुळे पंकजा मुंडे म्हणाल्या की, पंकजा मुंडे नाराज आहेत अशा चर्चा करू नका. मी पण 17 वर्षापासून राजकारण करत आहे. पंकजा मुंडे नाराज असल्याचा विषय बंद करा. आता मी सरळ 2024 ला मतदारसंघातून पक्षाने तिकिट दिले तर मी लढणार आहे, असे म्हणत पंकजा मुंडे नाराज असल्याच्या चर्चांवर अखेर मौन सोडले. पंकजा मुंडे म्हणाल्या की, मी गोपीनाथ मुंडेंचा वारसा चालवत नाही. अटल बिहारी वाजपेयी यांचा मुंडे साहेबांनी वारसा चालवला, तोच वारसा मी पुढे चालवते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वारसा पुढे चालवत आहे. मी शत्रूबद्दल कधी वाईट बोलत नाही तर ज्यांचा वारसा मी चालवते त्यांच्या विरोधात कशी बोलेन, असं म्हणत पंकजा मुंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरील नाराजीच्या चर्चांचं खंडन केलं आहे.

# निर्बंधमुक्त उत्सव असले, तरी स्वयंशिस्त पाळणे महत्वाचे!

## चंद्रकांत पाटील यांचे नागरिकांना आवाहन

।पुणे । महाईन्यूज।

**करोनानंतर राज्य सरकारने निर्बंधमुक्त उत्सवांची घोषणा केली असली, तरी स्वयंशिस्त महत्वाची आहे. दुसऱ्यांना त्रास होणार नाही अशा पद्धतीने उत्सव साजरे करावेत, असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री; चंद्रकांत पाटील यांनी केले.**



पुण्याच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल क्रिएटिव्ह फाउंडेशनचे आणि कै. विश्वनाथ भेलके प्रतिष्ठान याच्या वतीने कोथरूड नवरात्र महोत्सवात पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला क्रिएटिव्ह फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप खर्डेकर, विश्वस्त सतीश कोंडाळकर, कै. विश्वनाथ भेलके प्रतिष्ठानचे अध्यक्ष विशाल भेलके, उमेश भेलके, पुणे महापालिकेच्या शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा मंजुश्री खर्डेकर, श्वेताली भेलके, अक्षदा भेलके, कल्याणी खर्डेकर, उद्योगपती संजीव अरोरा, ग्लोबल ग्रुपचे मनोज हिंगोरानी, मुकुलमाधव फाउंडेशनचे सचिन कुलकर्णी, प्रवीण मसालेवालेचे संचालक विशाल चोरडिया आदी उपस्थित होते.पाटील म्हणाले की, करोनानंतर मुक्त वातावरणात उत्सव साजरे करण्यात येत आहेत. राज्य सरकारने निर्बंधमुक्त उत्सवाची घोषणा केली असली, तरी स्वयंशिस्त महत्वाची आहे. दुसऱ्यांना त्रास होणार नाही अशा पद्धतीने उत्सव साजरे करावेत.

### पुण्याचे प्रलंबित प्रश्न सोडविणार

पालकमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर पुण्याचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी कालबद्ध नियोजन करणार आहे,असे पाटील यांनी सांगितले.

---

# रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे पुणेकर वैतागले

## नागरिकांना पुढील सात महिने रस्ते खोदाईला सामोरे जावे लागणार

।पिंपरी। महाईन्यूज ।



रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे मेटाकुटीला आलेल्या नागरिकांना पुढील सात महिने रस्ते खोदाईला सामोरे जावे लागणार आहे. पावसाळा संपताच येत्या काही दिवसांपासून समान पाणीपुरवठा योजना, मल:निस्सारण आणि पथ विभागाच्या कामांसाठी रस्ते खोदाई केली जाणार असून विविध सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खासगी कंपन्यांकडूनही रस्ते खोदाई केली जाणार आहे. त्यामुळे पुढील पावसाळ्यापर्यंत बहुतांश भागात खोदलेले रस्ते असेच चित्र दिसणार आहे. दरम्यान, रस्ते दुरुस्ती आणि डांबरीकरणासाठी शंभर कोटींचा खर्च केला जाणार आहे. मात्र रस्ते पुन्हा खोदले जाणार असल्याने हा खर्च उधळपट्टीच ठरणार आहे.

ऑक्टोबर महिन्यापासून विविध सेवा वाहिन्या टाकण्यासाठी खासगी मोबाइल कंपन्यांना परवानगी दिली जाते. त्यासाठी प्रती रनिंग मीटर साडेपाच हजार रुपये शुल्क आकारणी केली जाते. खासगी मोबाइल कंपन्यांकडून तसे प्रस्ताव पथ विभागाला सादर केले जातात. त्याचबरोबरच बीएसएनएल, एमएनजीएल, महावितरण आदी शासकीय तसेच निमशासकीय यंत्रणांकडूनही काही कारणांसाठी रस्ते खोदाई केली जाते. त्यामुळे ऑक्टोबर ते मे अखेरपर्यंत रस्ते खोदाईची कामे सुरू असतात. जुलै ते सप्टेंबर या कालावधीत ही कामे काही काळापुरती थांबली होती. मात्र आता येत्या काही दिवसांत सुरू होणार आहेत. त्यामुळे सर्वत्र मोठ्या प्रमाणावर खोदलेले रस्ते पहायला मिळणार आहे.

शहरात एक हजार ४०० किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. यातील काही रस्ते सिमेंटचे तर काही रस्ते डांबरी आहेत. वर्षभरापासून या रस्त्यांची सातत्याने वेगवेगळ्या कारणांसाठी खोदाई करण्यात आली. महापालिकेच्या विभागांमधील समन्वयाअभावी एकाच रस्त्याची सातत्याने खोदाई करण्यात आल्याची वस्तुस्थितीही यानिमित्ताने पुढे आली होती. सततच्या खोदाईमुळे रस्त्यांची चाळण झाल्याने पादचारी, वाहनचालकांना गैरसोईला सामोरे जावे लागले होते.

या त्रासात आता नव्याने भर पडणार आहे.शहराला समन्यायी पद्धतीने पाणीपुरवठा करण्यासाठी समान पाणीपुरवठा योजना हाती घेण्यात आली आहे. त्याअंतर्गत कामे सुरू असून कामे वेगाने करण्याची सूचना पाणीपुरवठा विभागाला करण्यात आली आहे. मल:निस्सारण आणि पथ विभागाची कामेही प्रस्तावित आहेत. त्यामुळे पुढील सात ते आठ महिन्यांच्या कालावधीत हजारो किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची खोदाई होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

---

# ‘मॉडर्न’ची ‘गाभारा’ एकांकिका ‘भरत’ करंडकाची मानकरी



।पुणे। महाईन्यूज ।

अरे आवाज कुणाचा’च्या घोषणाबाजीमध्ये मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालयाची ‘गाभारा’ एकांकिका ‘भरत’ करंडकाची मानकरी ठरली. भरत नाट्य संशोधन मंदिरातर्फे आयोजित स्पर्धेत कलादर्शन, पुणे संस्थेच्या ‘यशोदा’ एकांकिकेस द्वितीय तर रेवण एंटरटेन्मेंटच्या ‘असा ही एक कलावंत’ या एकांकिकेस तृतीय पारितोषिक देण्यात आले.

भरत नाट्य संशोधन मंदिरातर्फे भरत करंडक एकांकिका स्पर्धेतील विजेत्या संघांना ज्येष्ठ अभिनेते स्वरूप कुमार यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. ‘लोकसत्ता’चे सहायक संपादक मुकुंद संगोराम कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. भरत नाट्य संशोधन मंदिराचे अध्यक्ष पांडुरंग मुखडे, विश्वस्त रवींद्र खरे, प्रदीप रत्नपारखी, प्रतिभा दाते, कार्याध्यक्ष अभय जबडे, कार्यवाह आणि स्पर्धेचे परीक्षक संजय डोळे, अश्विनी अंबिके, चंद्रशेखर भागवत या वेळी उपस्थित होते. ताण कमी होईल, अशी माहिती पीएमआरडीएचे मुख्य अभियंता विवेक खरवडकर यांनी दिली. संस्थेच्या नाटकांतून पुढे आलेला बालकलाकार अर्णव पुजारी, नृत्यांगना भाग्यश्री कुलकर्णी,

## सोसायटीधारकांचे प्रश्न सोडविण्यासाठी
# राष्ट्रवादी कटिबद्ध!

**विरोधी पक्षनेते अजित पवार यांची ग्वाही**
**शहरातील सोसायटीधारकांच्या जाणून घेतल्या समस्या**

**पिंपरी-चिंचवड ।। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**भारतीय जनता पक्षाची महापालिकेत पाच वर्षे सत्ता होती. मात्र, या सत्ता काळात भाजपने शहरातील सोसायटी धारकांचे प्रश्न सोडविले नाहीत. त्यामुळे सोसायटी धारकांचे प्रश्न गंभीर झाले आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस कटीबद्ध असल्याची ग्वाही राज्याच्या विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी आज (बुधवार) दिली.**



शहरातील सोसायटीधारकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी राज्याच्या विधानसभेचे विरोधी पक्षनेते पवार सोसायटीधारकांशी थेरगाव येथे सोसायटीधारकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी पवार बोलत होते. यावेळी शहराध्यक्ष अजित गव्हाणे, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर संजोग वाघेरे, योगेश बहल, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते संतोष बारणे, माजी नगरसेवक राहुल भोसले, मयूर कलाटे, श्याम लांडे, विनोद नढे, नाना काटे, शहर प्रवक्ते विनायक रणसुभे, महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, माजी नगरसेविका माया बारणे, युवक अध्यक्ष इम्रान शेख, सतीश दरेकर, संजय वाबळे, राजेंद्र साळुंखे, राजेंद्र जगताप, स्वाती काटे, कैलास बारणे, वर्षा जगताप, अतुल शितोळे, दीपक साकोरे, प्रकाश सोमवंशी आदी उपस्थित होते. शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक माजी नगरसेविका माया बारणे यांनी केले.

अजित पवार म्हणाले, शहरातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने प्रयत्न केले आहे. भामा-आसखेड धरणाचे पाणी शहराला मिळणार आहे. शहराला 24 तास पाणी कसे मिळेल, यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले. ठाकरे आणि शिंदे यांच्यातील वाद मिटतील का? असे विचारले असता पवार म्हणाले, दोघांतील वाद पराकोटीला गेले आहेत. त्यात पुढाकार कोणी घ्यायचा हा प्रश्न असून शब्दाने शब्द वाढत जातो. जसे दिवस पुढे जातील तशी कटुता कमी होईल. जनतेसमोर जातील. आता मुंबईतील पोटनिवडणुकीच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष राहील. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. या निवडणूक निकालावर लक्ष असेल. शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह कोणाला मिळणार की गोठवणार का? गोठवले तर दोघे दुसरे कोणते चिन्ह घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शिवसेनेतील या घडामोडींमुळे महाराष्ट्र अस्थिर होणार नसल्याचे पवार म्हणाले.

### राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये एकीचे दर्शन

शहरातील सोसायटी धारकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी शहर राष्ट्रवादीने पुढाकार घेतला आहे. या सोसायटी धारकांशी संवाद कार्यक्रमाला पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार विलास लांडे, माजी महापौर योगेश बहल यांनी कार्यक्रमात उपस्थिती लावत शहर राष्ट्रवादीमध्ये एकजुट असल्याचे दाखवून दिले.

### थेरगावातून सोसायटी धारकांचे प्रश्न सोडविण्याचा श्रीगणेशा

शहरातील सोसायटी धारकांचे प्रश्न सोडविण्यासाठी महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते संतोष बारणे आणि माजी नगरसेविका माया बारणे यांनी पुढाकार घेतला आहे. याची सुरुवात थेरगावातून झाली आहे. या संवाद कार्यक्रमाला शहराच्या विविध भागातील सोसायटी धारक आपल्या समस्या घेऊन मोठ्या संख्येने उपस्थित होते. याचे उत्तम नियोजन संतोष बारणे आणि माया बारणे यांनी केले होते.

### महागाईने जनता होरपळतेय !

सर्वसामान्य नागरिकांच्या जिव्हाळ्याच्या वाढत्या महागाई, बेरोजगारीकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. महागाईने जनता होरपळत आहे. आता वर्षाला 15 घरगुती गॅस सिलेंडर दिले जाणार आहेत. पण, त्याच्या अटी शर्ती अतिशय जाचक आहेत. 15 गॅस मिळणे मुश्कील होणार आहे, असेही विरोधी पक्षनेते अजित पवार म्हणाले.

---

# यावर्षी मोठ्या थाटात जेजुरीतील मर्दानी दसरा साजरा...
## वीररसाचे प्रतीक : खंडा उचलणे, आतषबाजी, पालखी सोहळा आदी परंपरांनी अद्याप जिवंत

**पुणे। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

वीररसाचे प्रतीक म्हणून जपलेला जेजुरीचा मर्दानी दसरा आज आधुनिक युगातही त्याच्या खंडा उचलणे, आतषबाजी, पालखी सोहळा आदी परंपरांनी अद्याप जिवंत आहे.जेजुरीचा खंडोबा हे साऱ्या महाराष्ट्रातील अठरापगड जातींचं कुलदैवत. येथील दसरा उत्सव म्हणजे आनंदाची पर्वणी असते. खंडोबा गड व कडेपठारावरील पालख्यांची मध्यरात्री होणारी भेट, एक मण (४२ किलो) वजनाचा प्राचिन खंडा (तलवार) उचलण्याची कसरत, फटाक्यांची आतषबाजी व तब्बल अठरा तास चालणारा पालखी सोहळा हे येथील दसऱ्याचे वैशिष्ट्य आहे.



या उत्सवातील प्रथेप्रमाणे नऊ दिवस येथील कोल्हाटी समाजातील कलावंत, वाघ्या-मुरुळी, गोंधळी जुनी गाणी म्हणून देवापुढे हजेरी देतात, तर घडशी समाजातील कलाकार दिवस-रात्र गडावर सनई-चौघडा, नगारा वाजवतात. दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी पेशव्यांनी सूचना दिल्यावर हजारो ग्रामस्थ व भाविकांच्या उपस्थितीत पालखीत खंडोबा व म्हाळसादेवीच्या मूर्ती ठेवून पालखी भेटाभेट सोहळ्यासाठी निघते. सदानंदाचा येळकोट या जयघोषात भंडाऱ्याची मुक्त उधळण होते. पालखी गडामधून डोंगरदरीमधील रमणा येथे आणून ठेवली जाते. रात्री हजारो भाविक कडेपठारावरील खंडोबा मंदिरात जातात. तेथून नऊ वाजता पारंपरिक वाद्यांच्या निनादात तेथील पालखी भेटीसाठी निघते. अंधारामध्ये दिवटय़ा, मशाली, हवाईनळे पेटवून उजेड केला जातो.

पालखी अवजड असल्याने खांदा देण्यासाठी पन्नास ते साठ खांदेकरी असतात. वाटेतील कठीण वळणे, उंचवटे पार करताना खांदेकऱ्यांचे कसब पणाला लागते. सुसरटिंगी येथील निमुळती, उंच टेकडी पार करताना पालखीच्या खांदेकऱ्यांना इतरांनी हाताची साखळी करून वर ओढावे लागते. पालखी डोंगरातील ओटय़ावर ठेवल्यानंतर हजारो भाविक खोल असलेल्या दरीमध्ये उतरतात. या दरीतच रात्री दोनच्या सुमारास भेटाभेट सोहळा सुरू होतो.

### हा तर मर्दानी दसरा!

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी चाळीस वर्षापूर्वी येथील दसऱ्याचा सोहळा डोंगरात पूर्ण वेळ डोळे भरून पाहिला आणि त्यांच्या तोंडून सहज शब्द आले हा साधासुधा दसरा नाही हा तर 'मर्दानी दसरा'. त्यावेळेपासून जेजुरीच्या दसऱ्याला 'मर्दानी दसरा' असे संबोधले जाऊ लागले.

### स्थानिक कलावंतांकडून विविध गाण्यांचे सादरीकरण...

रात्रीचे चांदणे, 'येळकोट येळकोट, जय मल्हार' ही डोंगर दऱ्यात घुमणारी ललकारी, फटाक्यांची आतषबाजी, आकाशाकडे मुक्तपणे झेपावणाऱ्या रंगीत तोफा अशा भारावलेल्या वातावरणात ही भेट घडते. दोन्ही पालख्यांच्या मागे नाभिक समाजातील मानकरी आरसे धरतात. पालखीसमोर पेटवलेले भुईनळे व हवाई नळय़ांच्या उजेडात आरशामध्ये दोन्ही पालख्यातील मूर्तींचे एकमेकांचे दर्शन घडते. हे झाल्यावर भेटाभेट झाल्याचे घोषित केले जाते. यानंतर रमण्यातील पालखी पुन्हा खंडोबा गडाकडे येण्यास निघते. वाटेत आपटापूजन झाल्यावर रावण दहन केले जाते. पहाटे पालखी गडाच्या पायथ्याशी येते. येथे धनगर समाजातील पारंपरिक कलावंत सुंबरान मांडून धनगरी ओव्या व गाणी म्हणतात. मेंढ्याची लोकर पालखीवर उधळली जाते. देव सकाळी गडावर आल्यावर स्थानिक कलावंत निरनिराळी गाणी म्हणून दमलेल्या देवांचे मनोरंजन करतात. यानंतर ऐतिहासिक खंडा (तलवार) उचलण्याची स्पर्धा सुरू होते. गडावर असणारा हा खंडा पेशवाईच्या काळात सोनोरीचे सरदार रामराव व महिपतराव पानसे यांनी खंडोबाला अर्पण केल्याचा इतिहास आहे. हा खंडा एका हातात जास्त वेळ उचलून धरण्याची व कसरती करण्याची स्पर्धा होते. कसरती पाहण्यासाठी अनेक परदेशी पाहुणेही येतात.

## संपादकीय

# ‘नर का नारायण’ धोरणातून निवड

***राष्ट्रपती पदासाठी ‘रालोआ’च्या उमेदवार द्रौपदी मुर्मू या १४ रोजी मुंबईत येत आहेत. त्यानिमित्ताने, स्वकर्तृत्वावर मोठ्या झालेल्या व भाजपाशी एकनिष्ठ राहूनच राजकारणात पुढे आलेल्या मुर्मू यांना भाजपाने उमेदवार म्हणून का निवडले, तसेच अटलबिहारी वाजपेयींच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री असलेले माजी भाजपा नेते यशवंत सिन्हा यांच्याबद्दल भाजपाला आज काय वाटते, हे स्पष्ट करणारे टिपण..***

भारताचे पंधरावे राष्ट्रपती निवडण्यासाठी येत्या १८ जुलै रोजी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने द्रौपदी मुर्मू यांची उमेदवारी जाहीर केली आहे. तर त्यांच्याविरोधात काँग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडीने यशवंत सिन्हा यांना उमेदवारी दिली आहे. रालोआने द्रौपदी मुर्मू यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या. कारण भारतीय राजकारणात त्यांचे नाव परिचित नव्हते. ओडिशाच्या मयूरभंज जिल्ह्यात बाईडापोसी नामक एका लहानशा खेड्यात, अत्यंत गरीब, आदिवासी अल्प भूधारक शेतकऱ्याच्या घरात जन्मलेल्या द्रौपदी मुर्मू या स्वतःच्या मेहनतीने, कष्टाने मोठ्या झालेल्या आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीला ७५ वर्षे झाली तरी अद्याप ओडिशा अप्रगत राज्य म्हणूनच ओळखले जाते. विकासापासून वंचित राहिलेल्या या राज्यातील मयूरभंज हा एक अत्यंत मागास जिल्हा आहे. अशा पार्श्वभूमीतून आलेली एक सर्वसामान्य, आदिवासी महिला भारताच्या राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचू शकते हा भारतीय संविधानाचा व लोकशाहीचा सर्वात महत्त्वाचा संदेश आहे.

पदवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर द्रौपदी मुर्मू यांनी ओडिशाच्या राज्य सरकारी पाटबंधारे खात्यात सहायक कारकून म्हणून जीवनाची सुरुवात केली. नंतर त्या शिक्षिका झाल्या. दरम्यान, त्या भाजपाच्या संपर्कात आल्या. ओडिशा हा काही भाजपाचे बलस्थान असलेला प्रदेश नाही. तेथील भाजपाचे संघटनदेखील फारसे मजबूत नाही. तरीही त्यांनी अन्य कोणत्याही राजकीय पक्षात न जाता भाजपाच्या कामात स्वतःला झोकून दिले आणि पक्ष देईल ती जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे करत राहिल्या. आपल्या गावच्या नगर पंचायतीचे सदस्यत्व, पक्षाचे जिल्हाध्यक्ष पद सांभाळता सांभाळता त्या ओडिशा विधानसभेत निवडून गेल्या. त्या वेळेला बिजू जनता दल व भाजपा यांची आघाडी होती. त्या संयुक्त मंत्रिमंडळात द्रौपदी मुर्मू मंत्री होत्या. त्यांना दोन वेळा मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाची सत्ता देशात व अनेक राज्यांमध्ये आल्यानंतर द्रौपदी मुर्मू झारखंडच्या राज्यपाल झाल्या. झारखंड हे आदिवासीबहुल राज्य आहे.

राज्यात राज्यपाल म्हणून नियुक्त झालेल्या त्या पहिल्या आदिवासी नेत्या होत्या.



## आनंदी सकाळ

### वैश्विक जीवन सुखी करण्यासाठी परब्रह्म श्रीस्वामी समर्थ भूतलावर अवतरले

काळचक्राच्या निरंतर भ्रमणगतीत वेळोवेळी भारतीय समाज उत्कर्षाकडून अपकर्षाकडे, उन्नतीकडून अवनीतीकडे जाताना दिसतो. अध:पतन व अराजकतेच्या वातावरणात माणसातील चैतन्य जागवण्यासाठी, मूल्ये अधिक कार्यप्रवृत्त करण्यासाठी ईश्वर अवतरित होऊन धर्माच्या जीवनरहाटीतून काळानुरूप कर्म, भक्ती व ज्ञानाचा प्रसार करतो. अकराव्या ते सतराव्या शतकाच्या समाप्तीपर्यंत संपूर्ण भारतात भक्तीची, आचार्यांच्या ज्ञान-नेतृत्वाची लहर उचंबळली. भक्तीच्या छत्राखाली संतांनी समाजाला एकत्र करून मानसिक खंबीरता, धैर्य दिले. लढण्याचे बळ दिले. समाजजीवनात त्यांनी सर्व उत्तम तत्त्वांचा मेळ घालता येईल, अशी शिकवण दिली.

# इंटरनेट क्षेत्राला ‘बूस्टर डोस’ देणारे ५ जी







५ जी नेटवर्कचा सर्वात मोठा फायदा उत्पादन क्षेत्रात होईल. स्मार्ट शहरे एकमेकांशी यामुळे जोडली जातील. तसेच शहरे आणि गावे यामुळे अधिक जलदरित्या यामुळे जोडली जाणार असून त्यांच्यामध्ये समन्वय साधणे यामुळे सहज शक्य होणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक उपकरणांची निर्मिती करण्यास यामुळे मदत होणार आहे. तसेच सध्या देशात उपलब्ध असलेली वैद्यकीय क्षेत्रातील उपकरणेही अधिक जलदरित्या यामुळे कार्यरत होतील. यामुळे वेळेत बचत होणार आहे. तसेच डॉक्टरांना दूरस्थ शस्त्रक्रिया करण्यासदेखील यामुळे आता शक्य होणार आहे. बँकिंग आणि इतर क्षेत्रातही यामुळे मोठे बदल घडविण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

‘व्हाट ए ग्रेट वर्क सरजी, इट्स स्टार्टेड ५ जी’, असा अनुभव सध्या भारतातील काही ५ जी इंटरनेट वापरकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. ४ जीच्या तुलनेत कैकपटीने अधिक वेगवान इंटरनेट म्हणून जगभरात प्रसिद्ध असणाऱ्या ५जी सेवेला ऑक्टोबर महिन्यापासून देशभरातील विविध १३ शहरांमध्ये प्रारंभ करत भारताने इंटरनेट क्षेत्रात नवी क्रांती घडविली, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ५ जी सेवा सुरू करत वेगवान इंटरनेट वापरकर्त्या प्रगतीशील देशांमध्ये आता आपलाही समावेश झाला असल्याचे भारताने या माध्यमातून जगाला दाखवून दिले. ५जी इंटरनेट सेवा सुरू झाल्याने इंटरनेट क्षेत्राला खऱ्या अर्थाने एक प्रकारे ‘बूस्टर डोस’ मिळाला असून अनेक क्षेत्रात आगामी काळात यामुळे आमूलाग्र बदल झालेले दिसतील.

शैक्षणिक, वैद्यकीय आदींसह विविध क्षेत्रांमध्ये या सेवेचा मोठा उपयोग होणार आहे. ५जी सेवा सुरू करणारा भारत हा जगातील काही पहिला देश नाही. भारताआधी जवळपास ७० ते ७२ देशांमध्ये ५जीची सेवा सुरू झाली असून त्या देशांमध्ये या सेवेमुळे विविध क्षेत्रांचे रूपडे पालटल्याची स्थिती आहे. त्यामुळे भारतातही निश्चितच या सेवेमुळे विविध क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल होतील, यात शंका नाही. प्रगतीशील देशांसोबत स्पर्धा करण्यासाठी भारताला या तंत्रज्ञानाची गरज होतीच, ती अखेर पूर्ण झाल्याने येत्या काळात ५ जीमुळे विकासाला अधिक चालना मिळेल, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

४ जी इंटरनेटचा सर्वाधिक वेग हा सध्या ५० ते १०० एमबीपीएसच्या घरात आहे. तर ५जी इंटरनेट सेवेचा वेग हा ४जीच्या तुलनेत १० पटीने असून १ ते १० जीबीच्या घरात याचा वेग आहे. हाच या दोन्ही सेवांमधील मुख्य फरक आहे. इंटरनेटचा वेग वाढल्यामुळे मोठ्यातील मोठा व्हीडिओ, सिनेमा आदी एका झटक्यात डाऊनलोड होतील, त्यामुळे सर्वांसाठी हा एक वेगळा अनुभव असल्याचे सांगितले जात असले तरी ५ जीही खरी दुनिया ही यापेक्षा काही वेगळीच आहे. संरक्षण, वैद्यकीय, शैक्षणिक, विज्ञान आणि विविध उत्पादन या प्रमुख क्षेत्रांना याचा मुख्य फायदा होणार आहे.

# प्लास्टिक सर्जरीच्या क्षेत्रात उंच भरारी

**प्राचीन काळी गुन्हेगारांना त्यांचे नाक कापण्याची शिक्षा दिली जात असे. आपला शिक्षावास संपला, की गुन्हेगार नाकाची पुनर्रचना करण्यासाठी सुश्रुतांकडे येत.**

नाकाला कपाळाच्या अथवा गालाच्या चामडीने पुन्हा आकार दिला जात असे. 'सुश्रुत संहिता' लिहिलेले सुश्रुत हे भारताचे पहिले सर्जन आणि जगाचे 'फादर ऑफ प्लास्टिक सर्जरी' म्हणून आजही ओळखले जातात. सन १७९३मध्ये पुण्यातील एका मराठमोळ्या कुंभाराने जगातली पहिली म्हणून ओळखली जाणारी ऱ्हिनोप्लास्टी कावसजी नावाच्या एका सरकारी वाहनचालकावर केली. अशा प्रकारे आपल्या सर्जनशील देशाने प्लास्टिक सर्जरीच्या क्षेत्रात उंच भरारी अगदी प्राचीन काळापासून घेतली आहे; तरीही आज सामान्य जनतेला असे का वाटते, की प्लास्टिक सर्जरी ही फक्त कॉस्मेटिक सर्जरी आहे, ती न परवडणारी आणि निषिद्ध आहे. हे क्षेत्र नवीन नसून, पूर्वापार चालत आलेल्या ज्ञानातून आणि सखोल संशोधनातून निर्माण झाले आहे.



पहिल्या महायुद्धात आणि त्यानंतरच्या काळात हे क्षेत्र अनेक दिशांनी घडले. युद्धात सैनिकांना चेहऱ्यावर, हातापायावर गंभीर जखमा होत. त्यांचे हात-पाय अनेक वेळा निकामी होत. तेव्हाचे डॉक्टर आणि सर्जन यांनी नसा, स्नायू, रक्तवाहिनी जोडण्याच्या व जखमा भरण्यासाठी पुनर्रचना करण्याच्या अनेक शस्त्रक्रिया केल्या आणि त्याहूनही जास्त शोधून काढल्या. काळाबरोबर या शस्त्रक्रिया प्रकाशित होऊन चर्चेत आल्या आणि वेगळा विभाग म्हणून उभ्या राहिल्या आहेत. आज 'ट्रॉमा रिकन्स्ट्रक्शन' अथवा 'ऑर्थोप्लास्टिक सर्जरी' असे विभाग आहेत.

जगात युद्ध चालू होते; त्या वेळी भारत कुष्ठरोगाशी लढा देत होता. कुष्ठरोगाचे रुग्ण बरे तर होत; पण त्यांचे हात-पाय विकृत होऊन राहत किंवा अनेक वेळा त्यांच्या जखमा ओल्याच राहत होत्या. अगदी अनेक वर्षे या जखमा तशाच राहत. या रुग्णांसाठी केवळ अवयवांची पुनर्रचनाच नव्हे, तर पुनर्वसनही आवश्यक होते. ही प्रक्रियाही महत्त्वाची असते. कुष्ठरोग झाल्यामुळे विकृत झालेल्या हातांसाठी निर्माण केलेल्या शस्त्रक्रियांनी प्लास्टिक सर्जरीला भव्य रूप दिले. कित्येक रुग्णांवर हाताच्या नसांसाठी, हात चालेल अशा शस्त्रक्रिया शोधून काढल्या गेल्या. त्या यशस्वीदेखील झाल्या. आज कुष्ठरोगाचे प्रमाण अगदी कमी आहे; पण नसांच्या विकृतीसाठी या शस्त्रक्रिया आजही केल्या जातात.

## ।। अभंगवाणी ।।



जन विजन जालें आम्हां ।
विठ्ठलनामा प्रमाणें ॥१॥
पाहें तिकडे बापमाय ।
विठ्ठल आहे रखुमाई ॥धृ.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### प्रसिद्ध उद्योगपती मुकेश अंबानी आणि पत्नी निता अंबानींना जीवे मारण्याची धमकी

। मुंबई । महाईन्यूज ।

देशातील प्रसिद्ध उद्योगपती आणि 'रिलायन्स' उद्योग समुहाचे प्रमुख मुकेश अंबानी आणि त्यांच्या पत्नी निता अंबानी यांना जीवे मारण्याची धमकी मिळाल्यानं खळबळ उडाली आहे. 'रिलायन्स' फाऊंडेशनच्या कार्यालयात अज्ञाताने फोन करत अंबानी कुटुंबियांना धमकी दिली आहे. या धमकीनंतर मुंबई पोलीस दल सतर्क झाले आहे. मुंबईतील मुकेश अंबानी यांच्या 'अँटिलिया' या बंगल्याची सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची मिळालेली धमकी ताजी असतानाचा मुकेश अंबानींसारख्या मोठ्या उद्योगपतीच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. दुपारी एकच्या सुमारास रिलायन्स फाऊंडेशनच्या सर एचएन रुग्णालयाच्या क्रमांकावर अज्ञाताने फोन करत रुग्णालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली आहे. याचबरोबर मुकेश अंबानी आणि निता अंबानींना ठार करणार असल्याचेही या अज्ञाताने या फोनवर म्हटले आहे. डीबी मार्ग पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेतली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# जिनांच्या थडग्यावर डोकं टेकवणारी तुमची औलाद...

## , उद्धव ठाकरेंचं भाजपावर टीकास्त्र; अमित शाहांचाही केला उल्लेख!

। मुंबई । महाईन्यूज ।

मुंबईच्या इतिहासात पहिल्यांदाच आज दोन दसरा मेळावे मुंबईकरांना आणि महाराष्ट्राला पाहायला मिळाले. एकीकडे उद्धव ठाकरेंचा तर दुसरीकडे एकनाथ शिंदेंचा दसरा मेळावा मुंबईत पार पडला. उद्धव ठाकरेंनी मेळाव्यातील आपल्या भाषणात बोलताना एकनाथ शिंदे, शिंदे गटातील बंडखोर यांच्यासोबतच भाजपा, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावरही तोंडसुख घेतलं. यावेळी हिंदुत्वाच्या मुद्द्यावर त्यांनी भूमिका मांडली. तसेच, देशातील महत्त्वाच्या मुद्द्यांवरून लक्ष विचलित करण्यासाठी हिंदुत्वाचा मुद्दा पुढे केला जात असल्याचा आरोपही त्यांनी भाजपावर केला.



### याकूब मेमनच्या कबरीच्या मुद्द्यावरूनही डागली तोफ!

दरम्यान, मुंबईतील याकूब मेमनची कबर सजवल्याचा आरोप झाल्यानंतर त्यावरून मध्यंतरी वाद झाला होता. त्यावरून उद्धव ठाकरेंनी भाजपाला सुनावलं आहे. "कुणाच्यातरी थडग्यावर जाऊन बोलायचं की हे थडगं बघा कसं सजवलंय. पाकिस्तानात जाऊन जिनांच्या थडग्यावर डोकं टेकवणारी तुमची औलाद, तुमच्याकडून आम्ही हिंदुत्व शिकायचं का? नवाज शरीफच्या वाढदिवसाला न बोलवता जाऊन केक खाणारा तुमचा नेता आणि तुम्ही आम्हाला हिंदुत्व शिकवणार? काश्मीरमध्ये सत्तेच्या लोभापायी दहशतवाद्यांशी संबंध असलेल्या मुफ्तीच्या पक्षाशी तुम्ही साटंलोटं करता आणि आम्हाला हिंदुत्व शिकवता?" असे थेट प्रश्न उद्धव ठाकरेंनी भाजपाला विचारले आहेत.

### "अमित शाह देशाचे मंत्री की भाजपाचे घरगुती मंत्री?"

"अमित शाह हे देशाचे गृहमंत्री आहेत की भाजपाचे घरगुती मंत्री हेच कळत नाहीये. नुसतं या राज्यात जा, त्या राज्यात जा, इकडे काड्या घाल, हे सरकार पाड, ते सरकार पाड असं चाललंय त्यांचं. मुंबईत येऊन म्हणे शिवसेनेला जमीन दाखवा. बघा आम्ही जमिनीवरच बसलो आहोत. आम्ही जमिनीवरचीच माणसं आहोत. मी आज त्यांना आव्हान देतोय की आम्हाला जमीन बघायचीच आहे. ती पाकव्याप्त काश्मीरची जमीन जिंकून दाखवा.

हिंमत असेल तर तिथली एक फूट जमीन जिंकून दाखवा. ती आमची मातृभूमीच आहे. ८ वर्षं झाली. मोदींच्या मुलाखती आजही ऐकतोय आम्ही.

### "...तर हे जय श्रीराम म्हणतील"

"तुम्ही हिंदुत्व हिंदुत्व करत गायीवर बोलता, महागाईवर बोला ना. महागाईच्या वेदना लोकांना जाणवू नयेत, म्हणून हिंदुत्वाचा डोस द्यायचा. जनता महागाईवर बोलली, तर हे जय श्रीराम म्हणतील. हृदयात राम आणि हाताला काम पाहिजे. पण हे महागाईवर बोलत नाहीत", असं उद्धव ठाकरे म्हणाले. "आरएसएसच्या होसबाळेंनी भाजपाला आरसा दाखवला आहे. त्यात काहीतरी सुधारणा होईल अशी आशा आहे. नाहीतर आरशात बघून स्वत:च भांग पाडत बसतील", असा टोलाही त्यांनी लगावला.

### मोहन भागवतांचं नाव घेत टीकास्त्र

यावेळी बोलताना उद्धव ठाकरेंनी मोहन भागवतांचं नाव घेत भाजपावर टीकास्त्र सोडलं. "मोहन भागवत मध्यंतरी मशिदीत जाऊन आले. मग काय त्यांनी हिंदुत्व सोडलं? की मिंधे गटानं नमाज पढायला सुरुवात केली? मोहन भागवत संवाद करायला गेले होते. तेव्हा मुसलमानांनीच सांगितलं की मोहन भागवत हे राष्ट्रपिता आहेत. आम्ही जेव्हा सांगितलं मोहन भागवतांना राष्ट्रपती करा, तेव्हा तुम्ही ऐकलं नाही. ते मुसलमानांसोबत बोलायला गेले तर म्हणे त्यांचं राष्ट्रकार्य सुरू आहे. पण आम्ही काँग्रेससोबत गेलो तर हिंदुत्व सोडलं. कुठले धागेदोरे कशाशी जोडताय?" असा सवाल उद्धव ठाकरेंनी भाजपाला केला.

---

# "तुम्ही बापाचे विचार विकले, बापालाच विकण्याचा प्रयत्न केलात"

## एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

। सातारा । । महाईन्यूज ।

शिवसेनेत ४० आमदारांनी बंड केल्यापासून शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे सातत्याने त्यांच्यावर बाप पळवणारी टोळी म्हणत टीका केली. या टीकेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. आम्हाला म्हणतात बाप चोरणारी टोळी निर्माण झालीय. अरे तुम्ही तर बापाचे विचार विकले, तुम्ही बापालाच विकण्याचा प्रयत्न केला, असा पटलवार एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केला आहे.

बीकेसी येथील एमएमआरडीए मैदानावर शिंदे गटाचा दसरा मेळावा पार पडला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर घणाघाती टीका केली.



"सहन करण्याची एक मर्यादा असते. सत्तेसाठी तुम्ही हिंदुत्वाला तिलांजली दिली, मग खरे गद्दार कोण? जनतेला समजलं आहे. त्यामुळे जनता आमच्याबरोबर आहे." बाळासाहेबांच्या समाधीवर गुडघे टेकून..."

"बाळासाहेबांच्या विचारांना तिलांजली देऊन तुम्ही जे पाप केलं, ते शिवसैनिक कधीही विसरणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील जनताही तुम्हाला माफ करणार नाही. तुम्ही वैचारिक व्यभिचार केला आहे. तुम्ही जे पाप केल आहे, त्यासाठी आधी बाळासाहेबांच्या शिवतीर्थावरील समाधीवर गुडघे टेका आणि माफी मागा, मग आमच्यावर बोला," असे आव्हान एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना दिलं आहे.

# "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला विरोध म्हणजे देशालाच विरोध"

। नागपूर । महाईन्यूज ।

विरोध करणाऱ्यांनी संघ समजून घेण्याची गरज आहे, असंही ते म्हणाले.

काही देशविघातक शक्ती राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संघ विचाराला विरोध करीत आहेत. मात्र, संघाला विरोध करणे म्हणजे भारताला आणि हिंदू संस्कृतीला विरोध करणे आहे. त्यामुळे अशा विरोध करणाऱ्यांनी संघ समजून घेण्याची गरज आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी केले.



विद्या विकास पब्लिशर्सच्यावतीने सरसंघचालक यांनी विजयादशमी उत्सवाच्यावेळी केलेल्या भाषणांचा मराठी अनुवाद 'विजयादशमी' पुस्तकाचे प्रकाशन सुनील आंबेकर यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. लेखिका व निवेदिका शुभदा फडणवीस यांनी या पुस्तकाचा अनुवाद केला आहे. विवेकानंद सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला महानगर सह संघचालक श्रीधर गाडगे, शुभदा फडणवीस, प्रकाशक नीलेश देशपांडे उपस्थित होते. यावेळी आंबेकर म्हणाले, गेल्या काही वर्षात संघ चर्चेत असल्यामुळे काही समाजविघातक शक्ती संघाला विरोध करत असतात. खरं तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विरोध म्हणजे हिंदुत्त्वाचा, भारतीयत्वाचा, राष्ट्रीयत्त्वाचा विरोध आहे, ही भावना आता जनसामान्यांमध्ये वृद्धिंगत होत आहे. सर्वसामान्य लोक वेगवेगळ्या माध्यमातून, वेगवेगळ्या विचारकांच्या तोंडून माहिती ऐकत असून त्यातून संघाविषयी सकारात्मक असो वा नकारात्मक एक दृष्टिकोन तयार होत आहे. एकंदर संघाच्या कार्याबद्दल उत्सुकता वाढत असल्याचे दिसून येते.

# ‘जम्मू काश्मीरमध्ये सर्व काही सामान्य’ म्हणणाऱ्या अमित शाहांवर मेहबुबा मुफ्ती संतापल्या!

## मुफ्ती यांनी नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा दावा केला



**। राजस्थान । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पिपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती यांनी आपल्याला श्रीनगरमधील घरी नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा दावा केला आहे. बारामुल्ला जिल्ह्यातील पट्टण येथे प्रवास करण्यापासून आपल्याला रोखण्यात आलं असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तीन दिवसांच्या जम्मू काश्मीर दौऱ्यावर असून बारामुल्ला जिल्ह्यात सभेला संबोधित करणार आहेत. पट्टण येथे ही सभा होणार आहे. याआधी श्रीनगरमध्ये त्यांनी बैठक घेत सुरक्षेचा आढावा घेतला. मेहबुबा मुफ्ती यांनी आपल्या घराच्या गेटचा फोटो ट्वीट करत नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा दावा केला आहे.

जम्मू काश्मीर पोलिसांनीही तात्काळ उत्तर देत त्यांच्यावर कोणतंही बंधन नसून, त्या हवं तिथे फिरु शकतात असं स्पष्ट केलं. जम्मू काश्मीर पोलिसांनी केलेल्या ट्वीटनंतर मेहबुबा मुफ्ती यांनी त्यांचा दावा फेटाळला असून, ते खोटं बोलत असल्याचा आरोप केला आहे.

### ■ मेहबुबा मुफ्तींचं ट्वीट काय?

**“गृहमंत्री जम्मू काश्मीरमध्ये सर्व काही सामान्य झालं असल्याचं ढोल बडवून सांगत आहेत. पण मला घरामध्ये नजरकैदेत ठेवण्यात आलं आहे. एका कार्यकर्त्याच्या लग्नासाठी मला पट्टणला जायचं होतं. जर एका माजी मुख्यमंत्र्यांचे मुलभूत अधिकार अशाप्रकारे काढून घेतले जात असतील, तर सर्वसामान्याचं काय होत असेल याचा विचार आपण करु शकतो,” असं मुफ्ती मोहम्मद यांनी म्हटलं आहे. अमित शाह यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी श्रीनगर आणि बारामुल्लादरम्यान ५० किमी हायवेवर निर्बंध लावले आहेत. वाहतुकीच्या मार्गातही बदल करण्यात आले आहेत.**

### ■ पोलिसांनीफेटाळला दावा

**पोलिसांनी मेहबुबा मुफ्ती यांचा दावा फेटाळत त्यांनीच आपला गेट बंद केला असल्याचं म्हटलं आहे. त्यांच्यावर कोणतेही बंधन नसल्याचा दावा पोलिसांनी केला असून, सोबत गेटचा फोटोही शेअर केला आहे.**

### ■ मेहबुबा मुफ्तींचं प्रत्युत्तर

**मेहबुबा मुफ्ती यांनी पोलिसांचे हे आरोप फेटाळले आहेत. त्यांनी ट्वीट करत म्हटलं आहे की “मला रात्री पोलीस महासंचालकांनी पट्टणला तुम्ही प्रवास करु शकत नाही असं सांगितलं. आज जम्मू काश्मीर पोलिसांनी स्वत:हून माझ्या घराचा गेट आतून बंद केला आणि उघडपणे खोटं बोलत आहेत. यंत्रणाच अशाप्रकारे वागत आहेत याचं वाईट वाटतं”. अमित शाह तीन दिवसांच्या जम्मू काश्मीर दौऱ्यावर असून राजौरी जिल्ह्यात त्यांनी एका सभेला संबोधित केलं. अमित शाह यांनी दहशतवाद्यांशी लढताना मृत्यू झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांची भेटही घेतली. बुधवारी ते बारामुल्ला येथे एका सभेला संबोधित करणार आहेत.**

# पूर्वी मोदी शेतकरी समर्थक होते, दिल्लीत आले अन् बदलले

## भाजप नेत्याचा घरचा आहेर



**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

मेघालयचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. त्यांनी पंतप्रधान मोदींवर शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे. सत्यपाल मलिक म्हणाले की, मी अनेक शेतकरी नेत्यांच्या संपर्कात असून त्यांच्या पाठिशी उभा राहणार आहे.एका यूट्यूब वृत्तवाहिनीशी बोलताना सत्यपाल मलिक म्हणाले, “मी शेतकऱ्यांना सांगत आहे की तुम्ही खंबीर राहा. मी मित्राची भूमिका बजावत राहीन. पण मला वाटते शेतकरी पुन्हा संघटित होऊन लढतील. याचा शेतकऱ्यांना राजकीय फायदाही होणार आहे. कारण शेतकऱ्यांना कळून चुकलं की, त्यांच्या जमिनी जात असून त्यांच्या मालाला भावही मिळत नाही. शिवाय शेतकऱ्यांची मुलं सैन्यात जायची, आता ती आशाही संपल्याचं ते म्हणाले. आपण शेतकऱ्यांच्या लढ्याचे नेतृत्व करणार नसून त्यात सहभागी होणार असल्याचं मलिक यांनी स्पष्ट केलं. पीएम मोदींवर निशाणा साधत सत्यपाल मलिक म्हणाले की, "प्रत्येक वेळी पीएम मोदी आणि सीएम योगी शेतकऱ्यांच्या थकबाकीबाबत आश्वासन देतात. परंतु आजपर्यंत थकबाकी मिळालेली नाही. ज्यांना लखीमपूर घटनेतील पीडितांना न्याय द्यायचा आहे, त्यांचा मला खूप अभिमान असल्याचं मलिक यांनी नमूद केलं. आता पंतप्रधान मोदी शेतकऱ्यांच्या हितावर बोलत नाहीत.

# पूर्वी मोदी शेतकरी समर्थक होते, दिल्लीबांगलादेश अंधारात!

## नॅशनल पावर ग्रीड फेल झाल्याने 14 कोटी नागरिकांवर विजेचे संकट

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



बांगलादेशातील नॅशनल पॉवर ग्रीडमधील बिघाडामुळे मंगळवारी (4 ऑक्टोबर) संपूर्ण देश अंधारात गेला आहे. सरकारच्या पॉवर युटिलिटी कंपनीने सांगितले की, बांगलादेशात ग्रीड निकामी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात ब्लॅकआउट झाला ज्यामुळे 140 कोटी लोकांना दुपारपासून वीजेशिवाय राहावे लागले. राज्य सरकारच्या बांगलादेश पॉवर डेव्हलपमेंट बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, देशाच्या पूर्व भागात कुठेतरी वीज ट्रान्समिशन अयशस्वी झाले.

विद्युत विभागाचे प्रवक्ते शमीम हसन यांनी सांगितले की, राजधानी ढाका आणि इतर प्रमुख शहरांमधील सर्व वीज प्रकल्प बंद करण्यात आले तसेच वीज खंडित करण्यात आली. बिघाड कुठे आणि का झाला हे शोधण्याचा अभियंते प्रयत्न करत असून यंत्रणा पूर्ववत होण्यासाठी काही तास लागू शकतात, असे सांगितले जात आहे. डिझेलवर चालणारे प्लांटही बंद

बांगलादेशच्या अलीकडील प्रभावी आर्थिक विकासाला विजेच्या कमतरतेमुळे धोका निर्माण झाला आहे. यात आयातीसाठी लागणारा खर्च कमी करण्यासाठी सरकारने सर्व डिझेलवर चालणाऱ्या वीज प्रकल्पांचे कामकाज स्थगित केल्यामुळे किमती वाढल्या आहेत. बांगलादेशात डिझेलवर चालणारे पॉवर प्लांट सुमारे 6 टक्के वीज निर्मिती करतात, त्यामुळे तेच बंद झाल्याने उत्पादन 1500 मेगावॅटपर्यंत कमी होऊ शकते.

### उद्योगांवर वाईट परिणाम

या महिन्याच्या सुरुवातीला बांगलादेश गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स आणि एक्सपोर्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष फारूख हसन म्हणाले की, परिस्थिती इतकी भीषण आहे की, कपड्यांच्या कारखान्यात आता दिवसाचे सुमारे 4 ते 10 तास वीज नसतात. बांग्लादेश हा चीननंतर जगातील दुसरा सर्वात मोठा कपडा निर्यातदार देश आहे. बांग्लादेश दरवर्षी आपल्या एकूण परकीय चलनापैकी 80 टक्के पेक्षा जास्त पैसे कपडा उत्पादनांच्या निर्यातीतून कमावतो.

गेल्या महिन्यात आशियाई विकास बँकेने एका अहवालात म्हटले आहे की, बांगलादेशची आर्थिक वाढ चालू आर्थिक वर्षात 7.1 टक्के च्या मागील अंदाजापेक्षा कमी होऊन 6.6 टक्के होईल. मंदावलेली निर्यात मागणी, देशांतर्गत उत्पादन समस्या आणि इतर कारणांमुळे होणारा कमकुवत ग्राहक खर्च ही मंदीची प्रमुख कारणे आहेत.



# दसऱ्याचा मुहूर्त! माधुरीनं घेतलं 40 कोटींचे घर

बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयानं गेल्या तीन दशकांहून अधिक काळ प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य करणाऱ्या माधुरीनं दसऱ्याच्या निमित्तानं एक गोड बातमी दिली आहे. ती ऐकताच चाहत्यांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत. तिच्यावर कौतूकाचा वर्षाव केला आहे. गेल्या काही दिवसांपासून माधुरीच्या नव्या घराची चर्चा रंगली होती. माधुरीनं आता मुंबईमध्ये एक लक्झरियस घर खरेदी केलं आहे. सी फेसिंग अपार्टमेंटमध्ये तिनं खरेदी केलेलं घर हे चाहत्यांच्या चर्चेचा विषय आहे. दसऱ्याच्या निमित्तानं त्याचे काही फोटोही व्हायरल झाले आहेत.


सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, माधुरीच्या नव्या घराची किंमत ही 48 कोटी रुपये आहे. अभिनेत्रीनं मुंबईच्या लोअर परेलच्या भागात घर खरेदी केली आहे. 53 व्या मजल्यावर माधुरीनं घेतलेलं घर चाहत्यांना भावलं आहे. माधुरी सध्या वेगवेगळ्या रियॅलिटी शोमध्ये दिसून येते. त्यात झलक दिखला जा मध्ये ती परिक्षकाच्या भूमिकेत आहे. सोशल मीडियावर आपल्या अनोख्या अंदाजासाठी माधुरी नेहमीच चर्चेत असते. तिला इंस्टावर फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. माधुरीनं खरेदी केलेल्या घराचे रजिस्ट्रेशन हे 28 सप्टेंबर 2022 रोजी झाल्याचे सांगण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, लोअर परिसरातील इंडिया बुल्स ब्ल्यु परिसरामध्ये तिनं हे घर खरेदी केलं आहे.

# महाराष्ट्राच्या राजकारणातील 'चाणक्य' आता रुपेरी पडद्यावर...

गेल्या काही वर्षात महाराष्ट्राच्या राजकारणाने देशाचेच नव्हे तर अवघ्या जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. महाराष्ट्रात झालेला सत्ताबदल, राजकीय खेळी, पक्षांमधील फुट, डावपेच, राडे आपण सर्वांनीच पाहिले. अजूनही महाराष्ट्राच्या राजकारणाची घडी सुरळीत झालेली नाही. पण या राजकरणावर चित्रपट, वेब सिरिज तयार करण्यासाठी अनेक दिग्दर्शक, निर्माते सज्ज झाले आहेत. अशाच एका चित्रपटाची नुकतीच घोषणा करण्यात आली. महाराष्ट्रातील राजकीय नाट्याचा थरार आता आगामी 'चाणक्य' (CHANAKYA) या चित्रपटातून प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त निर्माता निलेश नवलाखा याने चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन करत असून, 2023 मध्ये हा प्रदर्शित होत आहे. हा चित्रपट मराठी आणि हिंदी भाषांमध्ये प्रदर्शित होणार असून दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर चित्रपटाचे पोस्ट लॉंच करण्यात आले आहे. नवलाखा आर्ट्स मीडिया अँड एंटरटेनमेंट्सच्या माध्यमातून निलेश नवलाखा यांनी 'शाळा', 'अनुमती' आणि 'फँड्री' या राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त चित्रपटांची निर्मिती केली आहे. तसेच त्यांनी निर्मिती केलेल्या 'राक्षस' या चित्रपटाचंही बरच कौतुक झालं होतं. 'चाणक्य' या चित्रपटाद्वारे निलेश नवलाखा दिग्दर्शक म्हणून पदार्पण करत आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणामुळे उद्ध्वस्त झालेल्या एका कुटुंबाची आणि राज्याच्या मुख्यमंत्री पदासाठी आखलेल्या कट-कारस्थानाची, तसेच शह-काटशह, राजकीय सूडनाट्य आणि गद्दारीची गोष्ट 'चाणक्य' प्रेक्षकांना सांगणार आहे.



# "यंदा तुमचा दसरा कुठं..?" ठाण्याच्या नाट्यगृहातील प्रयोगानंतर संकर्षण कऱ्हाडेचा चाहत्यांना प्रश्न



मराठी अभिनेता संकर्षण कऱ्हाडे हा नेहमीच काही ना काही कारणांमुळे चर्चेत असतो. संकर्षण हा सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतो. त्याचा चाहता वर्ग फार मोठा आहे. सध्या संकर्षण हा माझी तुझी रेशीमगाठ मालिकेत यशच्या मित्राची भूमिका साकारत आहे. इतकंच नव्हे तर सध्या संकर्षण हा तू म्हणशील तसं या नाटकात काम करत आहे. नुकतंच त्याने यानिमित्ताने एक पोस्ट शेअर केली आहे. त्यामुळे तो चर्चेत आला आहे.

संकर्षण कऱ्हाडे हा त्याच्या कामाबद्दल नेहमी अपडेट देत असतो. काही दिवसांपूर्वी तो लंडनमध्ये कामानिमित्त गेला होता. यानंतर तो पुन्हा एकदा त्याच्या दैनंदिन कामात गुंतला आहे. नुकतंच त्याने त्याच्या नाटकानंतर एक पोस्ट शेअर केली आहे. यात त्याने काही फोटोही पोस्ट केले आहेत. यात त्याने गावाकडची माणसं भेटल्यानंतर काय आनंद होतो याबद्दल मत व्यक्त केले आहे. दरम्यान संकर्षण कऱ्हाडे हा सध्या त्याच्या मालिका आणि नाटक यामध्ये व्यस्त आहे. 'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेत त्याने यशचा मित्र समीर ही भूमिका साकरली आहे. या मालिकेचं शूटिंग, नाटकाचे प्रयोग, परदेशातील नाटकाचे दौरे यातून वेळ मिळाल्यानंतर त्याने अलिकडेच एक कविता इन्स्टाग्रामवर शेअर केली होती. ही कविता प्रचंड व्हायरल झाली होती.

# 'आई कुठे काय करते' मालिकेचे ८०० भाग पूर्ण

टीव्ही जगतात आवडीने बघितली जाणारी मालिका म्हणजे 'आई कुठे काय करते', काही महिने सतत टीआरपीमध्ये पहिल्या क्रमांकावर ही मालिका होती. कुटुंबातील सदस्यांसाठीकायम उभी राहणारी मात्र तीच स्वतःच अस्तित्व नसणारी अशी आई या मालिकेत दाखवण्यात आली होती मात्र आता त्याच आईने आपल्या कर्तृत्वावर स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. नुकतेच या मालिकेने ८०० भाग पूर्ण केले आहेत. मालिकेची लेखिका मुग्धा गोडबोले यांनी आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून ही माहिती दिली आहे. लेखिका मुग्धा गोडबोले यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहलं आहे '८००!! सीमोल्लंघन', अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. लेखिका मुग्धा गोडबोले या उत्तम अभिनेत्रीदेखील आहेत. त्या मूळच्या पुण्याच्या आहेत. लेखिका मंगला गोडबोले यांच्या त्या कन्या आहेत. राज्य नाट्यस्पर्धांमधून अभिनय करत त्यांनी पुढे 'कळत नकळत', 'चार दिवस सासूचे' यांसारख्या मालिकांमधून काम केले आहे. दर्जेदार संवाद, घराघरात घडणाऱ्या गोष्टींचे प्रतिबिंब या मालिकेतील भागांमधून दिसून येते. मालिकेतील कलाकारांचे अभिनय, संवाद यामुळे ही मालिका प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस पडली आहे. या मालिकेत आईची भूमिका साकारली आहे अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर यांनी, त्यांच्या भूमिकेचे कौतुक कायमच प्रेक्षकांकडून होत असतं.



ही मालिका दर सोमवार ते शनिवार संध्याकाळी ७. ३०ला स्टार प्रवाह या वाहिनीवर प्रक्षेपित होते. तसेच डिस्ने हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवरदेखील मालिकेचे भाग प्रदर्शित होतात. 'आई कुठे काय करते' या लोकप्रिय मराठी मालिकेला प्रेक्षकांनी खूप प्रेम दिले

## शॉर्ट न्यूज »

### वनडे मालिकेसाठी भारताचा उपट्रेन्टी-२० विश्वचषकाला मुकावे लागण्याची खंत -बुमरा



**।नवी दिल्ली। महाईन्यूज**

पाठीच्या दुखापतीमुळे ट्रेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेला मुकावे लागण्याची मला खंत आहे. मात्र, या स्पर्धेदरम्यान भारतीय संघाला माझे पूर्ण समर्थन असेल, असे वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा मंगळवारी म्हणाला. जायबंदी बुमरा ऑस्ट्रेलियात होणाऱ्या आगामी ट्रेन्टी-२० विश्वचषकाला मुकणार असल्याचे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) सोमवारी अधिकृतरीत्या जाहीर केले होते. बुमराची सध्याच्या घडीला जगातील सर्वोत्तम गोलंदाजांमध्ये गणना केली जाते. त्यामुळे तो विश्वचषकात खेळू न शकणे भारतासाठी मोठा धक्का मानला जातो आहे. "ट्रेन्टी-२० विश्वचषकात खेळता येणार नसल्याची मला खंत आहे. मात्र, तुमच्या शुभेच्छा, तुम्ही दाखवलेली काळजी आणि दिलेले पाठबळ याबद्दल मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे.

# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : खो-खो संघांची सुवर्णकमाई!

### महाराष्ट्राच्या अवंतिका, तेजस शिर्से, संयुक्ता काळे यांचेही सोनेरी यश

**।अहमदाबाद । महाईन्यूज ।**

महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला खो-खो संघांनी मंगळवारी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. जलतरणात अवंतिकाने ५० मीटर फ्री-स्टाईल प्रकारात राष्ट्रीय विक्रमासह सोनेरी यश मिळविले. तेजस शिर्सेने अडथळा शर्यतीत सुवर्णपदक पटकावले. जिम्नॅस्टिकमध्येही संयुक्ता काळेने सुवर्णयश संपादन केले. हॉकी, तलवारबाजी आणि बॅडमिंटन प्रकारातही महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपले आव्हान कायम राखले.

खो-खो क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या महिला संघाने ओडिशा संघावर डावाने १८-८ असा एक डाव व १० गुणांनी सहज विजय मिळवला. प्रियांका भोपीची अष्टपैलू कामगिरी निर्णायक ठरली. तिला प्रियंका इंगळे, रुपाली बडे, रेश्मा राठोड यांची उत्तम साथ मिळाली. पुरुष विभागात महाराष्ट्राने केरळचे आव्हान ३०-२६ असे सात मिनिटे राखून व ४ गुणांनी परतवून लावले. हृषिकेश मुर्चावडे, रामजी कश्यप, अक्षय भांगरे या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली.



### संजीवनीचे सुवर्णपदक हुकले!

**महाराष्ट्राच्या संजीवनी जाधवने सोमवारी १० हजार मीटर धावण्याची शर्यत जिंकली होती. मात्र, धावताना एकदा संजीवनीचा पाय दुसऱ्या रेषेमध्ये गेल्याने तिला अपात्र ठरवले होते. महाराष्ट्राने या निर्णयाला आव्हान दिले होते. मात्र, मंगळवारी तांत्रिक समितीने संजीवनीबाबतचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे तिचे सुवर्णपदक हुकले.**

जलतरणात अवंतिका चव्हाणने ५० मीटर फ्री-स्टाईल शर्यतीत विक्रमासह सुवर्णपदक पटकावले. अवंतिकाने २६.५४ सेकंद वेळ देताना प्राथमिक फेरीत माना पटेलने नोंदवलेला २६.६० सेकंदांचा विक्रम मोडीत काढला.ॲथलेटिक्समध्ये औरंगाबादचा राष्ट्रीय विक्रमवीर तेजस शिर्सेने पुरुषांच्या ११० मीटर अडथळा शर्यतीमध्ये १३.८४ सेकंद वेळ देत सुवर्णपदक जिंकले. कोमल जगदाळेने तीन हजार मीटर स्टीपलचेस शर्यतीत १० मिनिटे ०.२२ सेकंद अशा वेळेसह रौप्यपदक मिळविले.हॉकीत पुरुष संघाने हरयाणाचा ३-१ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली. स्क्वॉश प्रकारात महिला संघाला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

# शेष भारताची इराणी चषकावर मोहोर

### सौराष्ट्रवर आठ गडी राखून मात



**।राजकोट। महाईन्यूज ।**

वेगवान गोलंदाज कुलदीप सेनने अखेरच्या दोन फलंदाजांना झटपट माघारी पाठवल्यानंतर सलामीवीर अभिमन्यू ईश्वरनने (नाबाद ६३) केलेल्या अर्धशतकामुळे शेष भारत संघाने सौराष्ट्रवर आठ गडी राखून मात करत २९व्यांदा इराणी चषकाचे जेतेपद पटकावले.

मंगळवारी, सामन्याच्या चौथ्या व अखेरच्या दिवशी ८ बाद ३६८ धावांवरून पुढे खेळणाऱ्या सौराष्ट्रचा दुसरा डाव ३८० धावांत आटोपला. त्यांना केवळ १२ धावांची भर घालता आली. कुलदीप सेनने कर्णधार जयदेव उनाडकट (१३३ चेंडूंत ८९) आणि पार्थ भूत (१६ चेंडूंत ७) यांना बाद करत सौराष्ट्रचा डाव संपुष्टात आणला. सेनने या डावात पाच आणि सामन्यात आठ गडी बाद केले. विजयासाठी मिळालेले १०५ धावांचे लक्ष्य शेष भारताने ३१.२ षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात गाठले. उनाडकटने प्रियांक पांचाळ (२) आणि यश धूल (८) यांना लवकर बाद करत शेष भारताला अडचणीत टाकले. मात्र, ईश्वरन आणि श्रीकर भरत यांनी ८१ धावांची अभेद्य भागीदारी रचत शेष भारताचा विजय साकारला. ईश्वरनने ७८ चेंडूंत नऊ चौकारांच्या साहाय्याने नाबाद ६३ धावांची, तर भरतने ८२ चेंडूंत पाच चौकारांसह नाबाद २७ धावांची खेळी केली.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही